॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ /१०११ /२०२१ दि.१२, मे, २०२१

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील परीक्षांचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ:-** (१) विद्यापीठ पत्र जा.क्र.KBCNMU/८/Academic Calender/२९५/२०२०दि.३ नोव्हेंबर,२०२० अन्वये प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे Academic Calender.

(२) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.KBCNMU/५/Academic Calender/३७/२०२०दि.२९ जानेवारी,२०२१ अन्वये प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे Academic Calender

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाने D.O.No.F.1-1/ 2020 (Secy) दि.८ जुलै २०२० रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

(४) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ / ७८८ /२०२१,दि.०१, एप्रिल, २०२१

(५) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.KBCNMU/७B/८५०/२०२१, दि.२३/०४/२०२१

(६) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ /३९१/२०२१, दि.१० फेब्रुवारी, २०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भांकित (४) अन्वये प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या शैक्षणिक दिनदर्शिकेत नमूद केल्यानुसार पदव्युत्तर स्तरावरील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सत्र-१ नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे M.A., M.Com., M.Sc., M.S.W., M.A.M.C.J., M.B.A., M.M.S. (Computer Management), M.C.A., M.C.A.(Integrated या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रथम सत्रास प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा तसेच संदर्भांकित (५) अन्वये अभियांत्रिकी व औषधीनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र १व सत्र ३ आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या नियमित विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षाऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात Smartphone/ Laptop/ Desktop with web camera याद्वारे दि.१८ मे, २०२१ पासून आयोजित करण्यात येतील. असे कळविण्यात आलेले आहे.

या परीक्षांच्या सराव परीक्षा (Mock Test) सुरू झालेल्या असून, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. वरील ऑनलाईन परीक्षांच्या आयोजनाची कार्यपध्दती संदर्भांकित (६) वर नमूद पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार राहील.(जय्यत संदर्भाकरीता दि.१० फेब्रुवारी,२०२१ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.) या ऑनलाईन परीक्षांच्या अनुषंगाने साठी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी महाविद्यालय निहाय परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन ऑनलाईन परीक्षा समन्वयक (Online Examinations Co-ordinator) नेमण्यात येऊन, त्यांची नावे व संपर्क क्रमांक विद्यार्थ्यांना तसेच विद्यापीठास अवगत करावे.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वास.

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव अग्रेषित-**

१)मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३)मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४)मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ(विज्ञान व तंत्रज्ञान,परीक्षा गैरप्रकार चौकशी,रेकॉर्ड व पदवीप्रदान),क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ /३९१/२०२१ दि.१० फेब्रुवारी, २०२१

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी (Nov./Dec.2020) परीक्षांचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ :-** (१) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.KBCNMU/८/Academic Calender/२९५/२०२० दि.३ नोव्हेंबर,२०२० अन्वये प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे Academic Calender.
(२) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७अ/२९४/२०२१, दि.२९/०१/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नियमित सत्र-१ च्या पदवी व पदविका स्तरावरील प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान,प्रथम वर्ष समाजकार्य(B.S.W.),पदवीस्तरावरील व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासकम,डी.पी.ए., बी.ए.एम.सी.जे., बी.पी.ई. , बी.व्होक या अभ्यासक्रमांच्या परीक्षा संदर्भांकित (१) अन्वये प्रसिध्द सन २०२०-२१ च्या शैक्षणिक दिनदर्शिकेत नमूद केल्यानुसार दि.०२ मार्च,२०२१ पासून आयोजित करण्यात येणार आहेत.

तसेच विधी अभ्यासक्रमाच्या एल.एल.बी., आणि एल.एल.एम. च्या सत्र १ वगळता इतर परीक्षा विद्यापीठाचे संदर्भांकित (२) वर नमूद दि.२९/०१/२०२१ च्या पत्रान्वये **अ)** मध्ये कळविण्यात आल्यानुसार दि.०२ मार्च,२०२१ पासून आयोजित करण्यात येणार आहेत.

वरील अभ्यासक्रमांच्या परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.:-

(१) दि.०२ मार्च, २०२१ पासून घेण्यात येतील.

(२) **मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्य केल्याप्रमाणे परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.:-**

- परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरुप **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी** Multiple Choice Question **M.C.Q. स्वरुपात Online पध्दतीने Smart Phone/ Laptop/Desktop with Web camera** याद्वारे घेण्यात येतील व परीक्षेसाठी एकूण गुण पॅटर्ननुसार राहतील.
- परीक्षेचा कालावधी पदवीस्तरावरील परीक्षेसाठी ९० मिनिटे व पदव्युत्तर स्तरावरील १२० मिनिटे असेल.

- संदर्भीय पत्र क्र ०२ नुसार कळविण्यात आलेले प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्न सोडविण्याचे नियम खालीलप्रमाणे :

  १. ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ /बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेत ६० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही ४० प्रश्न सोडवावेत.

  २. ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ /बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेत ४० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही ३० प्रश्न सोडवावेत.

  ३. ज्या विषयाच्या वस्तुनिष्ठ /बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेत ३० प्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही २० प्रश्न सोडवावेत.

- सर्व प्रश्न सोडविले तरी जी ४०/३०/२० याप्रमाणे उत्तरे बरोबर असतील, त्या गुणांचे ६०/४०/३० गुणांमध्ये रुपांतर केले जाईल.
- या परीक्षेकरीता Negative Marking पध्दत लागू राहणार नाही.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

(३) महाविद्यालयाने सर्व विद्यार्थ्यांना बैठक क्रमांक प्राप्त झालेले आहेत किंवा नाहीत तसेच सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र उपलब्ध झालेले आहेत किंवा नाहीत, प्रवेश पत्रावरील विषय बरोबर आहेत किंवा कसे, याबाबतही विद्यार्थ्यांकडून खातरजमा करुन घ्यावी.

(४) सर्व विद्यार्थ्याचे ई-सुविधा Account मधील मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी याबाबतची माहिती अद्ययावत करण्याबाबत विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

(५) ज्या विद्यार्थ्यांकडे **Smart Phone/ Laptop/ Desktop with web camera** उपलब्ध करुन घेण्यास अडचणी असतील, अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे जवळचे नातेवाईक/ मित्र व इतर माध्यमातून सदर साधने उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सुचित करण्यात यावे. सदर साधने उपलब्ध होत नसल्यासच महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेसाठी Laptop/ संगणक संच (वेब कॅमेरासह) उपलब्ध करुन द्यावेत. जेणेकरुन या परीक्षेपासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याबाबत महाविद्यालयाने दक्षता घ्यावी, याकरिता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

(६) Online परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी User Manual उपलब्ध करुन देण्यात आलेले असून, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी Mock Test व Main Exam. करिता nmu.unionline.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. आपला PRN.No. हा Login ID व जन्मतारीख DD/MM/YY या स्वरुपातील पासवर्ड म्हणून उपयोग करावा (उदा. आपली जन्मतारीख जर ०८/१२/१९९९ असेल तर आपला पासवर्ड हा ०८१२९९ असा असेल) तसेच विद्यार्थ्यानी ज्या ठिकाणी इंटरनेट व्यवस्थित असेल अशा ठिकाणाहून परीक्षा द्यावी.

(७) विद्यार्थ्यांना Online परीक्षेदरम्यान काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास, त्या अडचणी विद्यार्थी परीक्षा सुरू असतांना सॉफ्टवेअरवरील Chatbot मध्ये नमूद करु शकतील.

(८) ऑनलाईन परीक्षेदरम्यान काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास, तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअर मार्फत आपोआपच वाढवून दिला येईल. तसेच यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप Save होऊन ज्या ठिकाणी परीक्षेला खंड पडला आहे, तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल.

(९) विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौउमवि/७-अ/२४२०/२०२०, दिनांक १७, सप्टेंबर २०२० नुसार ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०२० मध्ये झालेल्या अंतिम वर्ष /सत्राच्या ऑनलाईन परीक्षेकरिता ज्या Online Exam. Co-ordinator / IT Co-ordinator यांची नियुक्ती महाविद्यालयाने केलेली होती, त्यांची नियुक्ती या परीक्षेसाठी कायम करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास, सदर अडचणींचे निराकरण Online Exam Co-ordinator / IT Co-ordinator यांचेशी संपर्क साधून करावे. Online Exam Co-ordinator / IT Co-ordinator यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. Online Exam Co-ordinator / IT Co-ordinator यांच्या नावात बदल करावयाचा असेल तर मा.प्राचार्य करु शकतील, मात्र त्याबाबत विद्यापीठास कळविणे आवश्यक राहील.

(१०) विद्यार्थ्यांशी त्वरीत संपर्क साधता यावा याकरिता महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय Whatsapp/ Telegram Group तयार करावे व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती विद्यार्थ्यांना त्वरीत कळवावी.

(११) या परीक्षेचे वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येत आहे.

(१२) संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व प्रवेशपत्रावर असलेल्या विषयांप्रमाणे विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी.

(१३) विद्यार्थ्यांची ज्या विषयांची संधी संपलेली आहे, अशा विषयांकरिता समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा द्यावी. (जरी प्रवेशपत्रावर जुन्या विषयाची नोंद असली तरी).

(१४) विद्यापीठ परीक्षेचे वेळापत्रक, त्यात होणारे बदल व इतर अनुषंगिक अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.

(१५) विद्यार्थ्यांसाठी Mock Test चे आयोजन करण्यात येणार असून त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी. सुरुवातीला ०२ मार्च २०२१ पासून ज्या परीक्षेचे आयोजन केलेले आहे. त्या विद्यार्थ्यांच्या MOCK TEST ला सुरुवात होईल. तद्‌नंतर टप्प्याटप्प्याने इतर वर्गांच्या MOCK TEST चे आयोजन केले जाईल. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध होईल.

(१६) MOCK TEST करिता विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी लॉगीन करण्याकरिता https://nmu.unionline.in या संकेतस्थळावरुन User Name म्हणून PRN. No. टाकावा त्यांनतर पासवर्ड म्हणून जन्मतारीख DDMMYY या स्वरुपात नमुद करावी. सराव परीक्षेंत लॉगीन झाल्यावर आपली शाखा म्हणून Mock_Exam व नंतर आपला अभ्यासक्रम निवडावा. **प्रश्नाचे उत्तर निवडताना A B C D समोरील रेडियोबटनवर क्लीक करण्यात यावे.** यापध्दतीने परीक्षा दिली तर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. परीक्षा देतांना काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास सॉप्टवेअरमध्ये उपलब्ध असलेल्या Need Support? या Chatbot द्वारे निराकरण करावे तसेच महाविद्यायातील नेमणूक केलेले परीक्षा समन्वयकाशी संपर्क करावा. तसेच या परीक्षें संदर्भातील अधिकची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील होम पेजवर January-2021 Examination या लिंकवर http://nmu.ac.in/examination.aspx येथे उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेबाबत माहिती व्हावी, तसेच परीक्षा देतांना त्यांना काही अडचणी येऊ नयेत, याकरिता विद्यार्थ्यांनी Mock Test/सराव चाचणी देणे आवश्यक आहे.

(१७) या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, दि.२ मार्च,२०२१ पासून विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण तसेच मार्गदर्शन करण्यासंदर्भात व कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, या संदर्भांत सर्वतोपरी सहकार्य करण्याबाबत महाविद्यालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या Co-ordinator यांना मा.प्राचार्यांनी सूचना द्याव्यात.

(१८) वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या /बहुपर्यायी Multiple Choice Question (MCQ) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध होणार नाही.

(१९) सर्व संलग्नित महाविद्यालयांनी परीक्षेबाबत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी परिपत्रकाद्वारे महाविद्यालयाचे संकेतस्थळ, सूचना फलक , सोशल मिडीया, ऑनलाईन माध्यमातून प्रयत्न करावा.

(२०) विद्यापीठाचे विविध परिपत्रकांन्वये परीक्षा आयोजनाबाबत कळविण्यात आलेल्या सुचना व नियमांचे तंतोतंत पालन करुन परीक्षा कॉपी विरहित वातावरणात पार पाडाव्यात.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

( भ. प्र. पाटील )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव अग्रेषित-**

१) मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४)मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ(विज्ञान व तंत्रज्ञान,परीक्षा गैरप्रकार चौकशी,रेकॉर्ड व पदवीप्रदान),क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )
1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३०९४/२०२०     दि.१७, नोव्हेंबर २०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील परीक्षांचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ:-** (१) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.१७१/२०२०, दि.११ जून, २०२०.
(२) मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.२७ ऑक्टोबर,२०२० रोजीच्या सभेतील ठराव.
(३) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.KBCNMU/८/Academic Calender/२९५/२०२०दि.३ नोव्हेंबर,२०२० अन्वये प्रसिध्द शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे Academic Calender.
(४) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/७-अ/ ३०३९ /२०२०,दि.०५, नोव्हेंबर २०२०
(५) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.३३७/२०२०, जा.क्र.कबचौउमवि/७अ/पवमूवि/३०५७/२०२०,दि.९/११/२०२०.
(६) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.३३७/२०२०, जा.क्र.कबचौउमवि/७अ/पवमूवि/३०६०/२०२०,दि.१०/११/२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भांकित (४) वर नमूद पत्रान्वये परिपत्रक क्र.१७१/२०२०,दि.११ जून, २०२० मध्ये नमूद केल्यानुसार तसेच संदर्भांकित (३) अन्वये प्रसिध्द सन २०२०-२१ च्या शैक्षणिक दिनदर्शिकेत नमूद केल्यानुसार **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नियमित सत्राच्या विषयांच्या व या पूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण/विषयांच्या गुणात सुधारणा करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षांचे (Oct/Nov.2020) आयोजन वस्तुनिष्ठ बहुपर्यायी MCQ पध्दतीने दि.१० डिसेंबर,२०२० पासून ऑफलाईन (Offline) पध्दतीने करण्यात येणार असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे.**

तसेच संदर्भांकित(५) वर नमूद परिपत्रकान्वये संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे तसेच संदर्भांकित(५) वर नमूद परिपत्रकान्वये विद्यापीठ प्रशाळा/विभागांमध्ये प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

वरील संदर्भीय पत्र क्र. १ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल/मे,२०२० मधील जाहीर केलेल्या विषयांच्या गुणातील निकालात ज्या विद्यार्थ्यांना डिसेंबर २०२० च्या परीक्षेच्या वेळी सुधारणा करावयाची असेल, त्यांनी खालीलप्रमाणे नमुन्यात माहिती नमूद करुन आपल्या महाविद्यालय/ परिसंस्था/ प्रशाळा/ विभाग यांचेकडे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयत परीक्षा अर्ज सादर करण्याकरिता वेळोवळी जाहीर केलेल्या अंतिम तारखेपूर्वी जमा करावेत. या करिता महाविद्यालयांनी ऑन लाईन माध्यमातून विद्यार्थ्यांकडून माहितीचे संकलन करावे.

| Sr. No. | College Code | College Name | P.R.N | Name of Students | Class | Pattern | Subject/ Computer Code | Name of Subject for which performance is to be Improved |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4* | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

सदर Format मध्ये कोणताही बदल करु नये तसेच या तक्त्यांच्या अनुक्रमानुसारच माहिती भरावी.PRN No. ची नोंद अचुक असावी.

महाविद्यालय/ परिसंस्था/ प्रशाळा/विभाग यांनी वरील तक्त्यातील माहिती अभ्यासक्रम/विद्या शाखानिहाय महाविद्यालयांनी विद्यापीठात परीक्षा अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी एकत्रितरित्या विद्यापीठास sfc@nmuj.digitaluniversity.ac या ईमेलद्वारे सादर करावी. तद्नंतर अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ई-सुविधा कक्षामार्फत ऑनलाईन विद्यार्थ्याच्या व महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन दिल्यानंतर योग्य ते शुल्क भरुन विद्यार्थ्यास त्या विषयांच्या परीक्षेचा अर्ज ऑन लाईन Inward केल्यानंतर विद्यार्थ्यांस परीक्षेत प्रवेशित होता येईल. डिसेंबर २०२० च्या परीक्षेत संबंधित विषयात जे गुण प्राप्त होतील, ते अंतिम असतील व मागील परीक्षेतील संबधित विषयाचे गुण रद्द होतील. याची नोंद घ्यावी.

ईसुविधा कक्षाचे संपर्क दूरध्वनी/भ्रमणध्वनी आणि ईमेल खालीलप्रमाणे.:-

- दूरध्वनी क्र. : 0257-2258418 ,
- भ्रमणध्वनी क्र. : 9403002015, 9403002018, 9403002024,9403002042, 9403002054, 9403002082
- ईमेल आयडी : sfc@nmuj.digitaluniversity.ac

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव अग्रेषित-**

१) मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव-**

१) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ(विज्ञान व तंत्रज्ञान,परीक्षा गैरप्रकार चौकशी,रेकॉर्ड व पदवीप्रदान),क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) यंत्रणा विश्लेषक,संगणक केंद्र,परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) प्र.सहायक कुलसचिव,(गोपनीय पूर्वार्ध) परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४) विशेष कार्य अधिकारी (संगणक केंद्र),परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६) समन्वयक, एम.के.सी.एल., कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३०९५ /२०२० दिनांक: १७/११/२०२०

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

२) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख

विषय : विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनाबाबत........

संदर्भ : मा.अधिष्ठाता मंडळातील ठराव क्र. ०२/२०२०, दिनांक १०.११.२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/ विभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात न बोलविता ऑनलाईन माध्यमाव्दारे अध्यापन करण्यात येत आहे.

कोवीड-१९ ची एकंदरीत परिस्थिती लक्षात घेता, विद्यापीठाने यापूर्वी ठरवून दिलेल्या निकषानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे शक्य होणार नसल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज हे ऑनलाईन माध्यमातून पुर्ण करुन घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासंदर्भात अद्याप कोणत्याही मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने, तसेच अंतर्गत मुल्यमापनाबाबत ब-याच महाविद्यालयांकडून विचारणा केली जात असल्यामुळे, सदरचा विषय मा. अधिष्ठाता मंडळापुढे विचारार्थ सादर करण्यात आला असता, मा. अधिष्ठाता मंडळाने खालील ठराव संमत केलेला आहे.

**मा.अधिष्ठाता मंडळ ठराव क्र.०२/२०२०, दिनांक १०.११.२०२०**

"कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष महाविद्यालयात येत नसल्यामुळे यापूर्वी ठरवून दिलेल्या निकषानुसार त्यांचे मूल्यमापन करणे शक्य नसल्यामुळे तसेच या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज हे ऑनलाईन माध्यमातून पुर्ण करुन घेण्यात येत असल्याने या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन हे प्रत्येकी २०-२० गुणांच्या ०२ ऑनलाईन टेस्ट MCQ पॅटर्नप्रमाणे घेण्यात याव्यात."

तरी विद्यापीठाच्या मा. अधिष्ठाता मंडळाने विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासंदर्भात पारीत केलेल्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना अवगत करावे व त्यासंदर्भात कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with CamSc

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.:कबचौउमवि/7-अ/अं.मू. व प्रात्यक्षिक गुण /23/2022 दिनांक : 05/01/2022

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक व विभागप्रमुख,
कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
आणि कबचौउमवि परिसरातील सर्व शैक्षणिक प्रशाळा/विभाग

<u>विषय</u> :- शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये प्रवेशित प्रथम वर्ष व व्दितीय वर्ष थेट प्रवेशित वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पदवी (सत्र-1 किंवा सत्र-3) व पदव्युत्तर वर्गाच्या सत्र 1 च्या हिवाळी प्रात्यक्षिक /मौखिक व लेखी परीक्षांचे आयोजनाबाबत.

संदर्भ : जा.क्र. कबचौउमवि/7-अ/अं.मू. व प्रात्यक्षिक गुण /2853/2021 दिनांक :04/12/2021

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील प्रथमार्धातील होणा-या हिवाळी परीक्षांचे आयोजन माहे जानेवारी/फेब्रुवारी/मार्च,2022 मध्ये करण्यात आले असून, आपल्या महाविद्यालयातील पदवी (सत्र-1 किंवा सत्र-3) व पदव्युत्तर स्तरावरील सत्र 1 च्या नियिमित विद्यार्थ्यांच्या अंतर्गत/ बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/ मौखिक परीक्षांचे आयोजित करणे व त्याचे मूल्यमापन करणेसाठीची कार्यपध्दत तसेच अंतर्गत परीक्षांचे ऑनलाईन आयोजन करणे, त्याचे मूल्यमापन व ऑनलाईन गुण विद्यापीठास सादर करणेसाठी वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

वरील संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अंतर्गत मुल्यमापनाचे गुण वरील कार्यप्रणाली अवलंबून खाली नमुद केलेल्या तारखांना Online ADES Software व्दारे जमा करावे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रांत्यक्षिक परीक्षा आयोजनाची तारीख | लेखी परीक्षा सुरु होण्याची संभाव्य तारीख | अंतर्गत लेखी, अंतर्गत/ बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक परीक्षांच्या मूल्यमापनाचे गुण Online रित्या सादर करावयाच्या तारीख |
|---|---|---|---|---|
| **(1)** | **(2)** | **(3)** | **(4)** | **(5)** |
| 1. | F.Y. B.A., F.Y.B.com. & F.Y.B.Sc./I.M.C.A., B.A.M.C.J. /BSW/B.Voc. UG Management (All Courses), Education - B.P.E. **Sem.-I** | 20/01/2022 to 31/01/2022 | 01/02/2022 | 08/02/2022 |
| 2. | M.A./M.Com., /M.C.J. /M.S.W. P.G Management (All Courses) **(Sem.-I)** | 01/02/2022 to 07/02/2022 | 08/02/2022 | 15/02/2022 |
| | M.Sc. All Subject **(Sem.-I)** | 07/02/2022 to 12/02/2022 | 14/02/2022 | 18/02/2022 |

| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
|---|---|---|---|---|
| 3. | L.L.B. **Sem.-II to VI**<br>B.A. L.L.B. **Sem.-II to IV & Sem.VI to X**<br>L.L.M. **Sem.II & III** | After Theory Examinations and upto 31/01/2022 | 05/01/2022 to 21/01/2022 | 08/02/2022 |
| 4. | MCA / MBA/ BA LL.B /LL.B as per DTE /CET Cell Addmission rule **(Sem.-I)** | Before start of theory examination | Declared as per Instruction | After 05 days of start of theory examination. |
| 5. | LL.M. **Sem.-I** | Before start of theory examination | Declared as per Instruction | After 05 days of start of theory examination. |
| 6. | F.E. **Sem.-I** (A.Y 2021-2022 newly admitted through DTE) | 14/03/2022 to 20/03/2022 | 24/03/2022 | 25/03/2022 |
| 7. | DSE **Sem.-III** (A.Y 2021-2022 newly admitted through DTE) | 14/03/2022 to 20/03/2022 | 24/03/2022 | 25/03/2022 |
| 8 | F.Y.B.Pharm. **Sem.-I** (A.Y 2021-2022 newly admitted through DTE) | 14/03/2022 to 20/03/2022 | 24/03/2022 | 25/03/2022 |
| 9. | Direct S.Y,B.Pharm. **Sem.-III** (A.Y 2021-2022 newly admitted through DTE) | 14/03/2022 to 20/03/2022 | 24/03/2022 | 25/03/2022 |
| 10. | M. Pharm. **Sem.-I** (A.Y 2021-2022 newly admitted ) | 14/03/2022 to 20/03/2022 | 24/03/2022 | 25/03/2022 |

वरील वर्गाच्या अंतर्गत/बहि:स्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प /मौखिक परीक्षांचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर संदर्भांकित पत्रात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचना व मूल्यमापनाच्या कार्यपध्दतीनुसार ऑनलाईन पध्दतीने करावे, प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजनाचे कामकाज लेखी परीक्षेपूर्वी पूर्ण करुन (विधी अभ्यासक्रम वगळून) सर्व अभ्यासक्रमास प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा विहित वेळेवर आयोजित होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांनी जास्तीच्या तासिकांचे आयोजन करुन त्या संदर्भातील दस्तऐवज अद्यायावत (Record maintain) ठेवावे.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देवून वरील लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

05-01-22

(प्रा.डॉ.दिपक श.दलाल)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी** -

1) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, संगणक केंद्र, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगाव
2) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ , कबचौउमवि, जळगाव
3) सहा.कुलसचिव/कक्ष अधिकारी,**गोपनीय (पूर्वार्ध / उत्तरार्ध)**, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,कबचौउमवि,जळगाव
4) सहा.कुलसचिव/कक्ष अधिकारी - कला,वाणिज्य,विज्ञान व शिक्षणशास्त्र विद्याशाखा,कबचौउमवि,जळगाव
5) समन्वयक, ई-सुविधा कक्ष,कबचौउमवि,जळगाव